॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव २४, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या वतीने लेमा टेक्नॉलॉजी प्रा. लि., पुणे या कंपनीसाठी झालेल्या परिसर मुलाखतीद्वारे संगणकशास्त्र प्रशाळेतील सहा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

संगणक शास्त्र प्रशाळेतील एम.एस्सी. कॉम्प्युटर, आय.टी. आणि एम.सी.ए. च्या विद्यार्थ्यांसाठी परिसर मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते. ९८ विद्यार्थ्यांची चाचणी घेण्यात आली यातील २३ विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष मुलाखतीसाठी निवड करण्यात आली. यामधून अंकिता सुर्यवंशी, अलेश पाटील, रेवती फिरके, डिंगबरगिर गोसावी, अभय सोनवणे आणि खुशिया पाटील या सहा जणांची निवड करण्यात आली. कंपनीचे मनुष्यबळ विभागाचे उपाध्यक्ष वैभव लोणकर, मुख्य सॉफ्टवेअर अभियंता शशिकांत पाटील, सिनीअर आर्किटेक्ट निरंजन बोरावते, अभियंता अमोल सुर्यवंशी यांनी मुलाखती घेतल्या. या मुलाखतींचे व्यवस्थापन कक्षाचे उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील, समन्वयक प्रा. रमेश सरदार, संगणक शास्त्र प्रशाळेचे प्लेसमेंट समन्वयक डॉ. संदीप भामरे, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी केले. कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**बातमी क्र. २**

जळगाव २४, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने महाराजा सयाजीराव गायकवाड व्याख्यानमाले अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्राचे विभागीय व्यवस्थापक प्रवीणकुमार सिंग यांचे व्याख्यान व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत करण्यात आले होते.

बँकिंग व अर्थकारण या विषयावर झालेल्या व्याख्यानास प्रवीणसिंग यांनी भारताच्या अर्थप्रणालींचे तसेच बँकिंग सेक्टर मध्ये प्रवेश करण्यासाठी उपयुक्त अभ्यासक्रम व परीक्षेची माहिती दिली. प्रशाळेच्या संचालक प्रा. मधुलिका सोनवणे यांनी देखील यावेळी मनोगत व्यक्त केले. यावेळी व्य.प. सदस्य डॉ. पवित्रा पाटील, डॉ. आर.आर. चव्हाण, डॉ. अतुल बारेकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन अश्विनी मुंदडा यांनी केले. तर सूत्रसंचालन यश सोनवणे व सार्थकी देशपांडे यांनी केले.

**बातमी क्र. ३**

जळगाव २४, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेअंतर्गत कार्यरत असलेल्या महात्मा फुले अध्ययन व संशोधन केंद्र व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सत्यशोधक समाज स्थापना दिनाचे औचित्य साधून डॉ. देवेंद्र इंगळे यांचे व्याख्यान झाले.

या कार्यकम्राच्या अध्यक्षस्थानी प्र.-कुलगुरू प्रा.एस. टी. इंगळे हे होते. तर मंचावर विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे, महात्मा फुले अध्ययन व संशोधन केंद्राच्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. पवित्रा पाटील तसेच डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे डॉ. विजय घोरपडे हे उपस्थित होते. डॉ. इंगळे यांनी सांगितले की, जुन्या रूढी, अनिष्ठ प्रथा नष्ट करून नवसृष्टी निर्माण करण्यासाठी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केले. एकमय समाज म्हणजे राष्ट्र अशी व्याख्या महात्मा फुलेंनी केली. त्यातूनच आजच्या आधुनिक समताधिष्ठीत समाजाची निर्मिती झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पवित्रा पाटील यांनी केले. डॉ. अभय मनसरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुकन्या जाधव या विद्यार्थिनीने सूत्रसंचालन केले. डॉ. विजय घोरपडे यांनी आभार मानले.

.............................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २४ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी